प्रकरण पहिले

'स्त्रीवादी साहित्य संकल्पना आणि स्वरुप'

प्रकरण पहिले

स्त्रीवादी साहित्य संकल्पना आणि स्वरुप

०१ प्रास्ताविक

०२ स्त्रीवाद

२.१ स्त्रीवाद : संकल्पना
२.२ स्त्रीवादाची वाटचाल
२.३ स्त्रीवाद : स्वरुप आणि व्याप्ती

०३ स्त्रीवादी प्रवाह

३.१ पाश्चात्य स्त्रीवाद
३.२ भारतीय स्त्रीवाद

०४ स्त्रीवादी साहित्य

०५ स्त्रीवादी साहित्य : विविध पंथ

५.१ मवाळ स्त्रीवाद

५.२ मार्क्सवाद स्त्रीवाद

५.३ अस्तित्ववादी स्त्रीवाद

५.४ कृष्णवर्णीय स्त्रीवाद

५.५ पर्यावरणीय स्त्रीवाद

५.६ जहाल स्त्रीवाद

०६ स्त्रीवादी साहित्यशास्त्र
०७ स्त्रीवादी समीक्षा
०८ स्त्रीवादी समीक्षा : भौगोलिक वर्गीकरण
०९ समारोप
१० संदर्भसूचि

प्रकरण पहिले

स्त्रीवादी साहित्य संकल्पना आणि स्वरुप

०१ प्रास्ताविक

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात अनेक नवनवीन बदल झाले. ग्रामीण, दलित, आदीवासी, प्रादेशिक अशा अनेक जाणीवेतून साहित्यनिर्मिती झाली. हे होण्यास अनेक सामाजिक, राजकीय, आर्थिक तसेच सांस्कृतिक घटकही कारणीभूत ठरले व त्यातून बदलत्या जीवनाचे चित्रण करणारे हे वेगवेगळे साहित्यप्रवाह निर्माण झाले. गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या संदेशाने संपूर्ण भारतीयांचे लक्ष खेड्याकडे वळले. त्यामुळे ग्रामीण जीवनाचा, संस्कृतीचा विचार प्रामुख्याने पुढे येऊ लागला व ग्रामीण संवेदनशीलता व्यक्त होणारे ग्रामीण साहित्य निर्माण झाले. त्याचप्रमाणे पाश्चात्य विचारसरणी व फुले, आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीतून प्रेरणा घेऊन दलित नवसुशिक्षित पिढीने दलित साहित्याची निर्मिती केली. अशाप्रकारे पाश्चात्य विचारसरणी व नवशिक्षण, नवीन मूल्ये यातून भारतीय समाजजीवनाचे विविधांगी दर्शन होऊ लागले. याचा परिणाम साहित्यावर झाला आणि त्यातूनच भारतीय स्त्रीवादाची पुसटशी कल्पना येऊ लागली. यामध्ये सामाजिक चळवळीचेही महत्वाचे योगदान आहे. ज्या पद्धतीने दलित चळवळीतून दलित साहित्य निर्माण झाले तसेच स्त्री चळवळीतून स्त्रीवादी साहित्य निर्माण झाले.

या स्त्रीवादी साहित्याची संकल्पना समजून घेताना प्रथम 'स्त्रीवाद' ही संकल्पना अभ्यासणे आवश्यक आहे.

०२ स्त्रीवाद :

मनुष्य आपल्या अगाध बुद्धीच्या आधारावर आज ज्या उंच शिखरावर उभा आहे या त्याच्या कर्तृत्वाच्या परंपरेत स्त्रीदेखील पुरुषाइतकी महत्वपूर्ण घटक आहे. आज एकविसाव्या शतकात आपण सर्व जण साक्षरता ते संगणक व निती ते इंटरनेट अशी भाषा बोलतो तरीही या विज्ञानवादी समाजात अजूनही बहुसंख्य स्त्रियांना मात्र माणूसपणाच्या हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. पुरातनकाळापासून पुरुषांनी स्त्रियांना आपल्या इतके दडपणाखाली ठेवले की, दडपणाखालचे आयुष्य हेच स्त्रीचे नैसर्गिक आयुष्य असे स्त्रियांनाही वाटू लागले. 'रांधा, वाढा उष्टी काढा' या उंबरठ्यापलिकडचे जीवन त्यांच्या वाट्याला कधीच आले नाही. पण एकोणिसाव्या शतकातील परिवर्तनाच्या चळवळींचा खास करुन स्त्रीवर्गाला अनेक बाबतीत फायदा झाला. समाजसुधारकांनी चालविलेल्या स्त्री-सुधारक चळवळीतून आपल्याकडे अनेक वाद-विवाद, मतभेद झाले पण त्याचबरोबर स्त्रीसुधार कार्यही सुरु झाले. इंग्रजी साहित्यातील समता, स्वातंत्र्य आणि विश्वबंधूभाव या विचारत्रयींचा मराठी साहित्यक्षेत्रात प्रभाव पडला. साहित्यातून या नवनव्या दृष्टिकोनाबाबत चर्चा होऊ लागली आणि स्त्रीवादासारखी संज्ञाही त्यांच्याकडून उचलण्यात आली. स्त्रियांबाबत शिक्षणप्राप्तीची संधी व इतर राजकीय हक्काबाबतचे निर्णय, धार्मिक, सांस्कृतिक सुधारणाबाबतचे निर्णय घेतले गेल्यामुळे स्त्रिया आवाज उंचावू लागल्या आहेत व त्यातूनच स्त्रीवादी चळवळी उभ्या राहिल्या.

२.१ स्त्रीवाद : संकल्पना

स्त्रीवादी विचार हा विषमतारहित समाजाचे स्वप्न पाहणारा एक विचार आहे. आज जगभर तो वेगवेगळ्या रुपात मांडला जाऊ लागला आहे. १९७० नंतर मराठीमध्येही तो मांडला जाऊ लागला. नवसमाज निर्मितीसाठी सर्व पातळीवर

मानवी व्यवहारातील शोषणाची कारणे शोधणे आणि स्त्री–अस्मितेचा पुरस्कार करणाऱ्या नव्या पर्यायांची मांडणी करणे हे सर्वसाधारणपणे स्त्रीवादाचे स्वरुप आहे. अनेक विचारप्रवाहांना सामावून घेणारी अशी ही विचारप्रणाली आहे. स्पर्धेपेक्षा सहकार्यावर भर देणाऱ्या मवाळ स्त्रीवादापासून ते पुरुष सत्तेचा पाया उखडून टाकण्याची भाषा करणाऱ्या जहाल स्त्रीशक्ती वादापर्यंत अनेक भूमिकांचा या विचारप्रणालीत समावेश होतो.

'स्त्रीवादाविषयी 'स्त्रीसत्तेचा पुरस्कार म्हणजे स्त्रीवाद', 'बिनलग्नाचे स्वैराचाराला मुभा म्हणजे स्त्रीवाद', 'कंचुकी जाळा, मोहीम म्हणजे स्त्रीवाद', 'स्त्रियांनी निर्मिलेल्या वाङ्मयाची निर्मिती म्हणजे स्त्रीवाद' अशा अनेक चुकीच्या समजुती प्रचलित आहेत [१] असे सुक्मणी रॉय यांचे मत आहे.

पण स्त्रीवादाविषयी वेगवेगळ्या समीक्षकांनी आपली वेगवेगळी भूमिका मांडलेली आहे.

डॉ. अश्विनी धोंगडे स्त्रीवादाविषयी आपली भूमिका मांडताना म्हणतात, 'स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासून फारकत घेऊन स्वत:चा सवतासुभा निर्माण करणे नव्हे पण संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारुन तिला जो पशुतूल्य अवस्था प्राप्त करुन दिली त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करुन घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे'. [२]

तर स्त्रीवादाविषयी आपले मत मांडताना पाश्चात्य समीक्षिका लिंडा गार्डन म्हणतात, 'स्त्रियांचे दुय्यमत्व आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद'. [३]

गुंफा कोकाटे यांच्या मतानुसार 'व्यक्तीस्वातंत्र्य, आत्मशोध, आत्मभान, अस्मिता, समता हक्क, कर्तव्य व अधिकार या जाणिवांतून स्त्रियांनी आपल्या

हक्कांसाठी अस्मितापूर्ण लढा दिला. जातिभेद व स्त्रियांच्या हक्कांसाठी समतामूलक स्त्री–पुरुषांनी दिलेला हा आत्मभानाचा अस्मितापूर्ण लढा म्हणजे स्त्रीवाद' [४]

थोडक्यात आपल्याला असे म्हणता येईल की, 'पितृसत्ताक अशा राजकीय सत्ताकेंद्राला विरोध करणे म्हणजे स्त्रीवाद'. प्रस्थापित विचारप्रणाली स्त्री संदर्भात विचार करताना तिच्यावर स्त्रीत्वाच्या वेगवेगळ्या संकल्पना लादून तिच्या व्यक्तिमत्वाला साचेबंद करते. तिच्याविषयीच्या सर्व संकल्पनातून तिच्यातील माणूसपणा अधोरेखित न करता केवळ तिचे वस्तूमूल्य ठरविते. या प्रस्थापित लिंगभेदाधिष्ठित पुरुषकेंद्री दृष्टिकोनाविरुद्ध उभा राहणारा वाद म्हणजे स्त्रीवाद होय.

२.२ स्त्रीवादाची वाटचाल :

स्त्रीवाद ही संकल्पना १९६० नंतर वेगाने पुढे आली मात्र स्त्रीवादात अभिप्रेत असलेला स्त्री–पुरुष समतेचा विचार गेल्या ३०० वर्षात हळूहळू उत्क्रांत होत गेलेला आहे. १९७४ साली टोरान्टो येथे एक वैयक्तिक गरज म्हणून स्त्रीमुक्तीची संकल्पना जन्माला आली व या संकल्पनेतूनच स्त्रीवादाला सुरुवात झाली.

१७८३ साली फ्रेंच राज्यक्रांतीतून पुढे आलेला मानवी हक्कांचा जाहिरनामा स्त्रीवादी विचारांना प्रेरक व पोषक ठरला. त्यानंतर १७९० मध्ये 'ऑलिंच द गूंझ' या लेखिकेने स्त्रियांच्या हक्कांचा जाहिरनामा प्रसिद्ध करुन पुरुषांप्रमाणेच स्त्रीलाही एक स्वतंत्र वक्ती म्हणून सन्मानाने जगण्याचा हक्क असला पाहिजे अशी मागणी केली. इंग्लंडमध्ये १७९२ साली मेरी वुलस्टोनक्राप्ट यांनी The Vindication of woman या ग्रंथात स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन करणारी वैचारिक मांडणी केली. तर १८४८ मध्ये अमेरिकेतील गुलामगिरीविरुद्धच्या लढ्यात सहभागी झालेल्या स्त्रियांनी स्त्रियांच्या हक्कांचा जाहिरनामा घोषित करुन मालमत्तेत समानवाटा, शिक्षण व

रोजगाराच्या समान संधीची मागणी केली. त्यानंतर १९२० साली स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला.

१८ व्या व १९ साव्या शतकातील उदारमतवादी विचारांनी स्त्रीवादी विचारांची पायाभरणी करायला सुरुवात केली होती. त्याकाळी स्त्रीमुक्ती लढा हा संपूर्ण मानव समाजाच्या संदर्भातच लढला जात होता. उदा. १८६९ साली जॉन स्टुअर्ड मिल यांनी 'सब्जेक्शन ऑफ वुमन' या ग्रंथात विवाहसंस्था ही स्त्रियांच्या स्वातंत्र्यातील धोंड कशी आहे याची चर्चा केली असून, एकूणच पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेला प्रश्नांकित केले आहे. भारतातही १९ व्या शतकात स्त्रियांच्या पराधिनतेला पुरुषनिर्मित मूल्यव्यवस्थाच कशी जबाबदार आहे, याचा उहापोह करणारा 'स्त्री–पुरुष तुलना' हा निबंध ताराबाई शिंदे यांनी लिहिला.

सुधारकांनी धर्मसुधारणेच्या चळवळीतून अंमलात आणलेले १८२९ च्या सतीबंदीचा कायदा, १८५६ चे भारतीय विधवा–पुनर्विवाहाचे विधेयक, १८६० चे संमतीवयोच बील हे राजकीय निर्णय भारतीय स्त्रीवादी चळवळीचे नांदीरूप अविष्कारच होते असे मानायला हरकत नाही.

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात मात्र स्त्रीमुक्ती लढ्याला गती मिळाली. १९४९ साली सिमॉन–दि–बोव्हा यांनी 'दि सेकंड सेक्स' या ग्रंथातून स्त्रीत्वाची वेगळी ओळख स्पष्ट केली. 'स्त्री ही जन्मत: स्त्री नसते तर संपूर्ण समाजव्यवस्था तिला स्त्री म्हणून घडवते असा विचार बोव्हाने मांडला.' [५] या तिच्या भूमिकेमुळे जीवशास्त्रीय दृष्टिकोनातूनच स्त्रियांच्या अनुभवसृष्टीचे आकलन न होता स्त्रीवादी साहित्य आणि स्त्रीवादी समीक्षा विचाराला नवे परिमाण प्राप्त झाले. यापूर्वी १९१९ मध्ये वाङ्मयीन संदर्भात हाच मुद्दा 'व्हर्जिनिया वुल्फ' या लेखिकेनेही मांडला होता.

'साठोत्तरी कालखंडात स्त्रीवादी विचारात अनेकांगांनी भर पडत गेली आणि 'स्त्रीमुक्तीचा खुला विचारमंच म्हणजे स्त्रीवाद' अशी लवचिक व समग्रलक्ष्यी भूमिका पुढे आली. ' [६] जगभर स्त्री संघटनांचे जाळे निर्माण झाले. उदा. १९६६ मध्ये 'नॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ वुमेन (Now), स्विडनमध्ये 'ग्रुप १८' आणि डेन्मार्कमध्ये 'रेडस्टॉकिंग ग्रुप' या संघटना अस्तित्वात आल्या. या संघटनांचा उद्देश स्त्रियांची राजकीय ताकद वाढवणे हा होता. सिमॉन दि बोव्हा नंतर बेटी फ्रायडन, केट मिलेट, जर्मनी ग्रिअर इ. नी स्त्रीवादी चळवळीची राजकीय तत्वज्ञान म्हणून मांडणी केली. डॉ. मंगला वरखेडे यांच्या म्हणण्यानुसार, 'स्त्रीच्या शिक्षणावर, व्यवसायावर, संचारावर बंदी असता कामा नये, स्त्रीचा तिच्या शरीरावर हक्क असावा, मातृत्व ऐच्छिक असावे, प्रजोत्पादनासाठी स्त्रियांना गुलाम बनविणाऱ्या पुरुषसत्ताक व्यवस्थांना नकार हे या कालखंडातील स्त्रीवादाचे मध्यवर्ती सूत्र होते.' [७] अशाप्रकारे वाटचाल करत स्त्रीवाद आजच्या स्थानावर पोहोचला आहे.

२.३ स्त्रीवाद : स्वरुप आणि व्याप्ती

स्त्रीवाद ही १९६० नंतरच्या दशकात वेगाने पुढे आलेली विचारप्रणाली आहे. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रियांना मिळालेल्या दुय्यम स्थानाचा प्रतिवाद करणे आणि सामाजिक, राजकीय व आर्थिक सत्तास्थानात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त होण्यासाठी डावपेच आखणे हे स्त्रीवादाचे स्वरुप आहे. पाश्चात्य देशात जरी स्त्रीवाद प्रथम रुजला असला तरी भारतातही गेल्या तीन दशकात तो आपली पाळेमुळे रोवू लागला आहे.

स्त्री वाद ही एक राजकीय विचारप्रणाली आहे. समाज जीवनातील स्त्री शोषणाचे प्रत्येक क्षेत्र शोधून ते उखडून टाकण्याच्या दृष्टितून योजकतेने क्रियात्मक होणारी ही विचारप्रणाली आहे. ती प्रस्थापित स्त्रीशोषणाच्या परंपरा उधळून लावणारे

विचारव्यूह निर्माण करते, मानववंशातील सर्व स्त्रीसंदर्भात अन्यायकारक बाबींवर ती बोट ठेवते. अशाप्रकारे सर्व क्षेत्रातील पुरुषी वर्चस्वाला ती आव्हान देते व स्त्रियांना न्याय मिळवून देते.

. स्त्री वादाची व्याप्ती स्पष्ट करताना डॉ. मंगला वरखेडे म्हणतात, अपत्यनिर्मिती हे स्त्रीच्या गुलामीचे कारण नसून ते स्त्रीत्वाच्या श्रेष्ठत्वाचे लक्षण आहे अशी शांततामय सहजीवनाचा पुरस्कार करणारी आत्मसमर्पणवादी मवाळ मांडणी हे स्त्रीवादाचे एक टोक आहे तर आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर सर्व प्रकारच्या पुरुषसत्ताक अवडंबरांना आव्हान द्यावे आणि शिक्षण, रोजगार, आरोग्य, राजकीय सत्ता या सर्व क्षेत्रातल्या हक्कांसाठी संघर्ष करावा, स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या दुय्यमत्वाला नकार देऊन स्त्रीशक्तीचे दर्शन घडविणारी संघर्षशील भूमिका हे स्त्रीशक्तीवादी स्त्रीवादाचे दुसरे टोक सांगता येईल..[८] अशाप्रकारे अफाट व्याप्ती पसरलेल्या या स्त्रीवादाचे धर्मसंस्था, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, राजकीय संस्था, शिक्षणसंस्था यांच्या संस्थापक बांधणीतला पुरुषसत्ताक मतलबीपणा उघड करणे, रुढी परंपरा, कायदा, तत्वज्ञान, सौंदर्यविचार, भाषा यातील पुरुषसत्ताक मुल्यांना प्रश्नांकित करणे आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रातील आचारविचारांत दिसणारी स्त्री-पुरुष विषमतेतील विसंगती उघड करीत नवसमाज निर्मितीच्या विविध पर्यायांचा शोध घेणे हे तात्विक स्वरुप म्हणून सांगता येईल. म्हणजेच स्त्री व पुरुष यांच्या परस्परसंबंधामध्ये असणारे शोषण अधोरेखित झाले की, अधिक निकोप संबंधाच्या बांधणीला प्रारंभ होऊ शकतो हीच स्त्रीवादापुढील दिशा म्हणावी लागेल. अशाप्रकारे आजवर झालेल्या कुठल्याही वादाला जितके आयाम नसतील तितके स्त्रीवादाला प्राप्त झाले आहेत.

स्त्री व पुरुष यांच्यात जैविक लिंगभेद आहेच पण स्त्रीचे व्यक्तिमत्व मर्यादित व पुरुषी व्यवस्थेच्या दृष्टीने सोयीचे करण्यासाठी पुरुषप्रधान व्यवस्था स्त्री-पुरुषांवर

सांस्कृतिक लिंगभेद या संकल्पनेसाठी लिंगभाव, लिंगगंड, लिंगधर्म इ. संज्ञा आरोपित करते. असे हे पुरुषसत्ताक व्यवस्थेचे अन्यायकारक राजकारण ओळखून उघडकीस आणणे आणि स्त्रीला तिच्या दुय्यम स्थानावरुन केंद्रस्थानी आणणे हे स्त्रीवादाचे मूलभूत उद्दिष्ट आहे. तर प्रस्थापित पुरुषी राजकारणाला छेद देणे हे स्त्रीवादाचे कार्य आहे.

०३ स्त्रीवादी प्रवाह :

स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती वगैरे शब्द आज बरेच परिचित झाले आहेत. जगात सगळीकडेच या स्त्रीवादी प्रवाहाने लक्ष वेधून घेतलेले असून, चर्चा परिसंवादातही स्थान मिळवलेले आहे. याची सुरुवात जरी पाश्चात्य देशात झाली असली तरी भारतातही हळूहळू त्याची पाळेमुळे रुजू लागलेली दिसतात. त्यामुळे याचे पाश्चात्य स्त्रीवाद व भारतीय स्त्रीवाद या दोन भागात विभाजन केले जाते.

३.१ पाश्चात्य स्त्रीवाद :

१९६० च्या दशकात स्पष्ट रुप धारण केलेल्या जीवनाच्या सर्व क्षेत्रांची चिकित्सक मिमांसा करणारी स्त्रीवादी प्रणालीची मुळे सतराव्या शतकात सापडतात. लंडन, फ्रान्स, अमेरिका या देशांमध्ये स्त्रियांच्या हक्कासाठी ज्या चळवळी उभ्या राहिल्या त्यातून पुढे हळूहळू स्त्रीवादाची संकल्पना पुढे येऊ लागली. अशाप्रकारे पाश्चात्यांपासूनच या संकल्पनेला प्रारंभ झाला. १९०१ मध्ये प्रथम स्त्रियांच्या हक्कांबद्दलची मागणी करण्यात आली आणि १९४५ मध्ये फ्रेंच स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. जॉन स्टुअर्ट मिल यांनीही सन १८६९ मध्ये 'दि सब्जेक्शन ऑफ वुमन' हे पुस्तक प्रसिद्ध करुन विवाहसंस्था आणि कुटुंबसंस्था स्त्रीच्या व्यक्तिविकासाला आणि स्वातंत्र्याला बाधक कशा होतात ते स्पष्ट केले. १९ व्या शतकात अमेरिकेमध्ये गुलामगिरीविरुद्ध पुकारलेल्या लढ्यात स्त्रिया मोठ्या प्रमाणावर

सहभागी झाल्या. सन १८४८ साली एलिझाबेथ कँडी स्टॅटन आणि लुक्रेशिया मॉट यांनी 'अमेरिका सेनेका फॉल्स कन्हेंशन' ही परिषद भरवून त्यात स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा व हक्कांचा जाहिरनामा घोषित केला. १८९० मध्ये 'नॅशनल अमेरिकन वुमेन्स सफ्रेज असोसिएशन' या संस्थेच्या प्रयत्नातून १९२० साली अमेरिकन स्त्रियांना मताधिकार मिळाला. १९४९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'द सेकंड सेक्स' या पुस्तकामध्ये 'सिमॉन दि बोव्हा' यांनी स्त्री ही जन्मत: स्त्री नसते तर संपूर्ण समाजव्यवस्था तिला स्त्री म्हणून घडवते' अशी भूमिका मांडली. तर १९७७मध्ये प्रसिद्ध झालेले 'सेक्शुअल पॉलिटिक्स' या पुस्तकांद्वारे केट मिलेट यांनी पितृसत्ताक समाजव्यवस्थेवर हल्ला चढविला. अशा या लेखिकांनी आपापल्या ग्रंथातून स्त्रीवादी विचारधारेची पायाभूत मांडणी केली. त्यामुळे 'स्त्रीवाद आणि स्त्रीवादी समीक्षा यांच्या उभारणीचे आणि विकासाचे श्रेय हे सर्वस्वी पाश्चात्य स्त्रियांचे आहे' अशी भूमिका अरुणा दुभाषी मांडताना दिसतात. [९]

३.२ भारतीय स्त्रीवाद :

गुलामगिरी, शोषण, समाजातील दुय्यम स्थान, हिन दर्जा इ. सर्व बाबतीत भारतीय स्त्रीचे जगातल्या स्त्रीशी जवळचे नाते आहे. अगदी प्राचिनकाळापासून भारतीय स्त्रीवर अतोनात अन्याय होत आला आहे. प्राचिन काळातील स्त्रीचे वर्णन करताना अरुणा दुभाषी म्हणतात, 'या काळात भारतीय स्त्रीचे स्थान बीज वाढवण्याचे क्षेत्र किंवा भस्त्रा (कातडी पिशवी) एवढेच होते असे दिसते माणूस म्हणून कोणतेही स्थान वा प्रतिष्ठा तिला नव्हती. ' [१०]

१९ व्या शतकात इंग्रजी शिक्षणामुळे नवशिक्षितांनी आपल्या संस्कृतीकडे, धर्माकडे, समाजरचनेकडे नव्या दृष्टिने पाहण्यास सुरुवात केली. त्यातच स्त्रियांच्या प्रश्नावरील चर्चेलाही चालना मिळाली आणि स्त्रियांची स्थिती सुधारण्याचे अनेक

प्रयत्न केले गेले. राजा राममोहन रॉय यांनी सतीबंदीचा कायदा, संमतीवयाचा कायदा, सारडा कायदा अशा कायद्यान्वये त्यांनी स्त्रियांच्या शोषणाचे प्रश्न सोडण्यावर भर दिला.

म. फुले यांनी 'ज्या धर्मग्रंथामध्ये स्त्रियांना एक नियम व पुरुषांना दुसरा नियम असा दुटप्पीपणा मांडला त्यावर हे हेकट पुरुषांनी लिहिलेले धर्मग्रंथ आहेत' असा स्त्रीवादाला साजेसा हल्ला करुन स्त्रियांच्या अवस्थेविषयी समाजनेत्रात अंजन घालण्याचा प्रयत्न केला. तसेच मुलींसाठी शाळा, विधवांपासून झालेल्या अर्भकांना आधार देण्यासाठी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' ही संस्था सुरु केली. धोंडो केशव कर्वे यांनीही 'विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळी', 'अनाथ बालिकाश्रम' अशा संस्था स्थापन करुन विधवांचे जीवन मार्गी लावण्याचे प्रयत्न केले. स्त्रीशिक्षणासाठी फुल्यांबरोबरच आगरकर, कर्वे, सर सईद अहमद यांनीही प्रयत्न केले.

अशाप्रकारे सतीबंदी, विधवाविवाह, संमतीवय इ. बाबतीत कायदे झाल्यामुळे स्त्रियांच्या अन्यायाला प्रतिबंध निर्माण झाला. डॉ. आंबेडकर या सारख्या नेत्यांच्या प्रयत्नामुळे स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला व दलित स्त्रियांनाही त्यांनी चळवळीत येण्यासाठी प्रोत्साहन दिले. गांधीजींनीही आपल्या विचारांनी स्त्रियांना नवे ध्येय, नवी दिशा दिली. त्यांच्या १९३८ साली झालेल्या मिठाच्या सत्याग्रहात स्त्रियांचा आश्चर्यजनक सहभाग म्हणजे त्यांच्या विचारांची, प्रयत्नांची फलश्रुती असे म्हणता येईल. अशाप्रकारे भारतीय स्त्रीच्या विकासामध्ये पहिले प्रयत्न पुरुषांचेच दिसून येतात.

पण या सुधारकांच्या प्रयत्नातून सुशिक्षित झालेल्या स्त्रियांनी विदेशी स्त्रियांनी चालविलेल्या उपक्रमांनी प्रभावित होऊन जीवनाचा सर्वांगिण अभ्यास करण्याकरिता आवश्यक ग्रंथनिर्मिती करण्याचा उपयुक्त असा प्रयत्न केला. भारतात १९७५ नंतर

म्हणजेच १९७५ हे 'जागतिक महिला वर्ष' म्हणून जाहीर झाले आणि स्त्री संघटनांना बळ लाभले. 'मुलगी झाली हो' हे ज्योती म्हापसेकर यांचे नाटक आणि प्रदर्शने, स्लाईड शो, भाषणे, लेख इ. द्वारा स्त्रीवादी विचारसरणीचा प्रसार होऊ लागला.

वेदकाळात स्त्रियांना अनेक अधिकार होते, भारतीय दर्शनापैकी शाक्त दर्शनात आणि तंत्रमार्गात स्त्री ही प्रधान मानली गेली आहे. बुद्धानेही स्त्रियांना संघात प्रवेश दिला. त्यांनी लिहिलेले वाङ्मय थेरिगाथेमध्ये समाविष्ट केले आहे. नंतरच्या काळात महानुभाव, वारकरी, लिंगायत इ. पंथांनीही स्त्रीला स्थान दिले आहे. त्या – त्या पंथातील स्त्रियांनी आपल्या साहित्यनिर्मितीतून 'स्त्रीधर्म म्हणोनि न व्हावे उदास' असे म्हणत स्त्रीवादी विचारसरणीची छोटीशी पाऊलवाट निर्माण केलेली दिसते.

धार्मिक क्षेत्राप्रमाणे महाराष्ट्राच्या राजकारणामध्येही स्त्रियांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग आढळतो. शिवकाळापासून जिजाबाई, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई अशा अनेक स्त्रिया राजकारणात सक्रिय होत्या. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय राजकारणात स्त्रियांनी निरनिराळ्या ठिकाणी सत्तास्थान मिळवलेले आहे.

१९ व्या शतकात स्त्री शिक्षणाचे लोण पसरत गेले व त्यांनी शिकून सुधारणेच्या कार्याला हातभार लावला. महाराष्ट्रात पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे यांच्यापासून एक परंपराच निर्माण झाली. ताराबाई शिंदे यांनी तर स्त्रियांच्या बंदिस्त चौकटीवर प्रहार करणारे 'स्त्री–पुरुष तुलना' हे पुस्तक लिहिले. त्याविषयी बोलताना विलास खोले म्हणतात, कुटुंबव्यवस्थेची बारकाईने छाननी करुन पुरुषांना सर्वश्रेष्ठत्व, देवतुल्यत्व बहाल करणाऱ्या परंपरेला आव्हान देऊन स्त्री–पुरुष समानतेची ग्वाही देणारे पुस्तक त्यांनी सिद्ध केले. स्त्रीच्या प्रदीर्घकालीन मौनानंतर उमटलेला, समाजाला कुंठित करुन टाकणारा स्वर म्हणजे ताराबाईंचे 'स्त्री–पुरुष तुलना' हे लेखन होय. [११] रमाबाई रानडे यांनी १८८२ मध्ये

'आर्य महिला समाज' ही पहिली स्त्रियांची संघटना स्थापन करुन स्त्री-मुक्तीच्या कार्याला हातभार लावला. त्याचबरोबर शारदासदन, मुक्तीसदन या संस्थांतून स्त्रियांना अर्थार्जनास उपयुक्त ठरणारी कौशल्ये शिकविण्यावर भर दिला. त्या आपल्या एका भाषणात म्हणतात, 'मुलीच्या शाळेत शिक्षिकाच नव्हेत तर इन्स्पेक्टर्स पण स्त्रियाच हव्यात. उत्तम बोर्डिंग शाळांची मुलींसाठी जरुरी आहे व त्यांना वैद्यकीय मदत पण अत्यंत आवश्यक आहे. लज्जेमुळे पुरुष डॉक्टरांना त्या आपले दुखणे सांगण्याऐवजी मृत्यू पत्करतात.' [१२] अशाप्रकारे स्त्री-पुरुष समानतेचा नवा आदर्शच त्यांनी रुढ केला. पार्वतीबाई आठवले यांनी मजूर चळवळीचे नेतृत्व करुन जागतिक मजूर परिषदेत स्त्रियांना कमी वेतन दिले जाते हा प्रश्न मांडला. गोदावरी परुळेकर, अनुताई वाघ, मेधा पाटकर यांच्यामार्फत हे लोण पुढे पसरलेले दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात काशीबाई कानिटकर, शांता नाशिककर, मुक्ताबाई दीक्षित, कृष्णाबाई मोटे, मालतीबाई बेडेकर यासारख्या स्त्रियांनी स्त्रियांचे विश्व आपल्या साहित्यातून प्रकट केले. भारताच्या स्वातंत्र्यचळवळीत तर सरोजिनी नायडू, कमलादेवी चटोपाध्याय, अरुणा असफअली या स्त्रियांनी तर नेतृत्वशक्तीचे प्रदर्शन केले.

अशाप्रकारे रोजच्या स्वयंपाकाच्या व संगोपनाच्या जबाबदारीच्या जाळ्यात अडकलेल्या स्त्रीला नवी दिशा, नवी किरणे दाखवण्यासाठी भारतीय स्त्रीवाद प्रयत्नशील राहिलेला दिसतो. या स्त्रीवादाने स्त्रियांबरोबर, पुरुषांनाही स्त्रियांबद्दल पुनर्विचार करायला प्रवृत्त केले आणि स्त्री म्हणजे केवळ शरीर नव्हे तर त्या शरीराच्या इच्छा, आकांक्षा, भावना यांचा विचार व ऐतिहासिक आणि सामाजिक व्यवस्थेतील स्त्रीचे स्थान याची जाणीव करुन दिली.

०४ स्त्रीवादी साहित्य :

भारतीय स्त्री आज समाजात ज्या स्थानावर आहे ते स्थान म्हणजे समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नांचा परिणाम आहे पण तरीही स्त्री म्हणावी तितकी स्वतंत्र झालेली नाही. ती शिकून सवरुन कितीही पुढे गेली तरी समाजाचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललेला नाही. तो परंपरागत दृष्टिकोन बदलण्यासाठी व समाजाच्या बंधनातून बाहेर पडण्यासाठी स्त्री आपल्यापरिने प्रयत्न करीत आहे आणि अशी आपली जाणीव ती साहित्यातून व्यक्त करत आहे. आपले स्वत:चे जीवन, व्यथा, वेदना, विचार व्यक्त करण्यासाठी तिने स्वत:चे असे एक साहित्यदालन उभे केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात जे अनेक साहित्यप्रवाह आले त्यापैकी 'स्त्रीवादी साहित्य' हा एक महत्वाचा प्रवाह आहे.

'स्त्रीवादी साहित्य' ही संकल्पना गेल्या तीन-साडेतीन दशकातील आहे. विशेषत: १९७५ ते १९८५ या आंतरराष्ट्रीय महिला दशकात स्त्रियांच्या अस्मिता जागृतीसंबंधी जे संघटित प्रयत्न झालेत त्यातूनच साहित्यातील स्त्री प्रतिमेचे पुनर्वाचन करण्याची निकड निर्माण झाली आणि या प्रक्रियेतूनच स्त्रीवादी साहित्यशास्त्र मांडले जाऊ लागले. स्त्रीवादी साहित्य लिहणाऱ्या लेखिकांच्या लेखनातून स्त्रीवादी जाणिवा प्रकर्षाने आढळतात. म्हणूनच त्यांच्या साहित्याला 'स्त्रीवादी साहित्य' म्हटले जाऊ लागले.

गुंफा कोकाटे यांनी स्त्रीवादी साहित्याची व्याख्या करताना म्हटले आहे, 'स्त्रीवादी विचार, स्त्री केंद्री अनुभव व स्त्रीविशिष्ट जाणिवांचे नवनिर्माण करणारे ज्वलंत लेखन म्हणजे स्त्रीवादी साहित्य' किंवा, 'स्त्रीपुरुष नातेसंबंध, त्याची मानसिकता, गुंतागुंत, मानवी मनांचे ताणतणाव, स्त्री-पुरुष या घटकांमधील संघर्षाचे विश्लेषण, स्त्रीचे दमन व शोषण व्यक्त करणारे लेखन म्हणजे स्त्रीवादी साहित्य.' [१३]

यावरुन आपल्याला भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ अशा काळात बदलत गेलेली स्त्री–पुरुषांची मानसिकता ज्या साहित्यात समर्थपणे व्यक्त होते त्या साहित्यात 'स्त्रीवादी साहित्य' असे म्हणता येईल. सध्याच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत माणसाच्या मनाला येणारी अस्वस्थता, विमनस्कता व या विमनस्क अवस्थेतून निर्माण होणारी उदयाची आशा यांचे अजब असे रसायन स्त्रीवादी साहित्यातून व्यक्त होते.

वाङ्मयीन इतिहासाचा अभ्यास करताना वाङ्मयाच्या मुख्य प्रवाहात स्त्रियांचे साहित्य अत्यल्प आहे. यामागे फक्त एकच कारण आहे ते म्हणजे या साहित्याचा निर्माता पुरुष नसून एक स्त्री आहे. विसाव्या शतकात थायन वॅटने लिहिलेल्या कादंबरीच्या इतिहासात तर स्त्रियांच्या कादंबरी लेखनाची बोळवण फक्त एका वाक्यात केली आहे. '१८ व्या शतकातील अधिकांश कादंबऱ्या ह्या स्त्रियांनी लिहिल्या. ' [१४] या एका वाक्याखेरीज या कालखंडातील कोणत्याही लेखिकेची दखल त्याने घेतली नाही, म्हणजे त्याकाळी स्त्रिया लेखन करत असूनही त्यांना केवळ अनुल्लेखनाने मारले जात होते. अशाप्रकारे स्त्रीपणा आणि क्रियाशुन्यता यांच्या समीकरणामध्ये स्त्रीच्या क्रियाशीलतेला कुठलीच जागा नसल्याने स्त्रीवादी साहित्याने त्याचा धिक्कार केला आहे.

१९६० साली प्रथम 'स्त्री' या नियतकालिकामधून पाश्चात्य स्त्रियांच्या कथालेखनाचा परिचय करुन देणारी लेखमाला श्रीम. कमला फडके यांनी सुरु केली. त्यानंतर सीमॉन, दि. बोव्हाँ यांच्या 'सेकंड सेक्स' या पुस्तकाचा परिचय करुन देणारी मुक्त अनुवादमाला शांताबाई किर्लोस्कर यांनी 'स्त्री' मधून सुरु केली. त्यानंतर युनोने १९७५ हे जागतिक महिला वर्ष म्हणून जाहीर केले व त्यानिमित्ताने झालेल्या विचार जागृतीमुळे स्त्रियांच्या प्रश्नावर अभ्यास करणारी अनेक पुस्तके लिहिली गेली.

तराबाई शिंदे यांचे 'स्त्रीपुरुष तुलना', कृष्णाबाई मोटे यांचे 'काळाची पावले', गीता साने यांचे 'भारतीय स्त्री', छाया दातार यंची 'पुरुषकेंद्री' आणि 'स्त्री–पुरुष' ही पुस्तके तसेच अनेक निबंधही या काळात प्रसिद्ध झाले. 'मराठी स्त्रीशक्तीचे राजकारणी स्वरुप' या रोहिणी गवाणकर यांच्या पुस्तकाने स्त्रीच्या नेतृत्वशक्तीची ओळख करुन दिली. त्याचप्रमाणे स्त्री दशकामध्ये व नंतरही अनेक नियतकालिके व वृत्तपत्रे यांनी या विषयाबद्दल पुष्कळ लेखन प्रसिद्ध केले आणि आजही मोठ्या प्रमाणात स्त्रीवादी साहित्य जोमाने पुढे येत आहे.

स्त्री साहित्याचे स्वरुप कसे असावे याबाबत पाश्चात्य समीक्षिका हेलन सिझू म्हणतात, 'स्त्रियांचे साहित्य हे एकाचवेळी सर्व बाजूंनी विकसित हो जाणारे लेखन असले पाहिजे अर्थापेक्षा भावगर्भतेच्या जवळ जाणारे लेखन हे स्त्रीत्वाच्या जवळ जाणारे ठरेल.' [१५]

'एकूणच स्त्रीवादी साहित्याचा विचार आपण जेव्हा करतो तेव्हा पुढील गोष्टींची जाणीव होते. स्त्रीच्या म्हणून असलेल्या, मानले गेलेल्या भूमिकांना नकार देणे, स्त्रीच्या दुय्यमत्वाचा धिक्कार करुन समतेची मागणी करणे, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होते व या अन्यायाला साहित्यातून वाचा फोडणे, सामाजिक मुख्य प्रवाहात सामील होणे आणि हे सर्व एक 'स्त्री' म्हणून आपले वेगळेपण राखून विविध दृष्टिकोनातून साहित्यातून मांडले जाऊ लागले.'

०५ स्त्रीवादी साहित्य : विविध पंथ

वाङ्मयीन स्त्रीवादात विविध पंथ असलेले आढळून येतात.

५.१ मवाळ स्त्रीवाद :

स्त्री–पुरुषांना समान हक्क आणि विसाकाच्यासमान संधी प्राप्त झाल्या तर स्त्री–पुरुष विषमता नष्ट होईल अशी मवाळ पंथियांची नेमस्त भूमिका आहे. शिक्षण,

रोजगार, मताधिकार, मालमत्तेचा हक्क या सर्वच क्षेत्रात स्त्री-पुरुषांना समान संधीची मागणी करणे हे मवाळ पंथीय स्त्रीवादाचे स्वरुप आहे.

५.२ मार्क्सवादी स्त्रीवाद :

मार्क्सवादी, स्त्रीवादी कुटुंबसंस्थेचा विचार भांडवलशाहीच्या संदर्भातच करतात. पुरुष ही भांडवलदार आणि स्त्री ही श्रमिक अशी ती मांडणी आहे. आर्थिक परावलंबन हे स्त्रीदास्याचे मूलकारण आहे. म्हणून ही विचारसरणी आर्थिक परावलंबन दूर करण्यावर भर देते. घरकामास उत्पादक श्रममूल्य प्राप्त झाले पाहिजे. अपत्यनिर्मितीच्या कामालाही विनिमयमूल्य असले पाहिजे. मार्क्सवादी स्त्रीवादाविषयी आपले मत मांडताना डॉ. मंगला वरखेडे म्हणतात, 'भांडवलशाहीतून परिणत झालेला वर्गलढा आणि लैंगिक श्रमविभागणीतून झालेली स्त्री-पुरुष विषमतेची परिणती यांची सांगड घालून मार्क्सवादी स्त्रीवादाची मांडणी केली जाते.' [१६]

५.३ अस्तित्ववादी स्त्रीवाद :

'स्त्रीत्वाची नवी ओळख निर्माण करणे हेच या विचारप्रणालीचे ध्येय आहे. स्त्रियांना स्वतःचे असे अस्तित्व असत नाही. ती कुणाची तरी बहीण, पत्नी, माता असते. धर्म, शासन, शिक्षणव्यवस्थेनही स्त्रीला दुय्यम स्थान असते म्हणून स्त्रीने पुरुषसत्ताक व्यवस्थेने लादलेली बंधने झुगारुन दिली पाहिजेत आणि एकूण समाजव्यवस्थेत सक्षम माणूस म्हणून वावरण्याचा आपला हक्क मिळवला पाहिजे अशी या विचारसरणीची भूमिका आहे.'

५.४ कृष्णवर्णीय स्त्रीवाद :

हा अमेरिकन स्त्रीवादी चळवळीचा एक विस्तार आहे. पुरुषसत्ताक दमनापासून स्त्रीची मुक्ती झाली पाहिजे अशी सर्वसाधारणपणे स्त्रीवादाची मांडणी असते. परंतु, 'गौरस्त्रिया आणि कृष्णवर्णीय स्त्रिया यांच्यात जोपर्यंत समानपातळीवर भगिनीभाव

नांदत नाही तोपर्यंत कृष्णवर्णीय स्त्रियांना आपली लढाई स्वतंत्रपणे लढणे भाग आहे.' अशी भूमिका बेलहूक यांनी मांडली. [१७] केवळ लैंगिक विषमताच नव्हे तर वंश आणि वर्गीय विषमताही नष्ट केली पाहिजे. असा समग्रलक्ष्यी विचार कृष्णवर्णीय स्त्रीवादात अभिप्रेत आहे.

५.५ पर्यावरणीय स्त्रीवाद :

ही विचारसरणी वनस्पती आणि प्राणि सृष्टीतील सुफलीकरण, प्रजनन, संगोपन व संवर्धन यातील प्राकृतिकतेशी स्त्री शरीराचे सम्यक नाते आहे यावर भर देते. स्त्रियांबरोबर होणाऱ्या अप्राकृतिक कृत्यांविरुद्ध सामाजिक जनजागरण घडवून आणण्यावर भर देणारी ही विचारधारा आहे. याविषयी आपली भूमिका मांडताना मंगला वरखेडे म्हणतात, 'पर्यावरणवादी स्त्रीवादाने सृष्टीच्या नैसर्गिक चक्राशी स्त्री देहातील बदलाच्या स्थितीशी प्राकृतिक संबंध आहे यावर भर दिला आहे आणि स्त्री शरीराकडे न–नैतिक दृष्टितून पाहण्याची दृष्टी दिली.' [१८]

५.६ जहाल स्त्रीवाद :

स्त्रियांचे शोषण करणाऱ्या पुरुषांविरुद्ध आक्रमक लढा देवून संपूर्ण समाजव्यवस्था बदलण्याचा आग्रह धरणारी ही विचारप्रणाली आहे. साहित्यक्षेत्रातही सृजनशिलतेचा मक्ता पुरुषांकडेच आहे. त्याला शह देवून स्त्रियांच्या लेखकत्वाची पुनर्मांडणी करण्यावर ह्या विचारसरणीचा भर आहे. सॅण्ड्रा गिल्बर्ड, सूझन गुबर, हेरॉल्ड ब्लूम, हेलन सिझू, ल्यूरी इरिगारे यांनी या विचारप्रणालीची सैद्धांतिक मांडणी केली. पुरुषसत्तेचे केंद्र विचलित करणे आणि त्याला समांतर असे स्त्रीप्रधान केंद्र निर्माण करण्यावर या विचारधारेचा भर आहे. पुरुषकेंद्री भाषिक व्याकरण नाकारुन स्त्रीकेंद्री संहिता निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हे या गटाचे वैशिष्ट्य सांगता येते.

मराठीत प्रिया तेंडूलकर, गौरी देशपांडे, पद्मजा फाटक यांनी जहाल स्त्रीवादी भूमिकेशी सुसंगत अशी आशयसूत्रे घेऊन कथा, कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

०६ स्त्रीवादी साहित्यशास्त्र :

एलेन शोवॉल्टर यांनी 'सेक्स्युअल पॉलिटिक्स' या आपल्या पुस्तकातून प्रथम स्त्रीवादी साहित्यशास्त्राची रुपरेषा मांडली. इ.स. १९७९ पर्यंत स्त्रीवादी समीक्षा केवळ अनुभवजन्य ज्ञानावर आधारित होती व विविध सिद्धांतांच्या झंझावातात ती एकाकी व अनाथ वाटत होती. स्त्रीवादी समीक्षेचे एकच एक ठाशीव रुप निर्देशित येत नव्हते. [१९] असे शॉवॉल्टर यांचे मत होते. त्यामुळे या काळात त्यांनी स्त्रीवादी समीक्षेतील दोन प्रमुख प्रवाहांचे दिग्दर्शन केले आहे.

१) फेमिनाईन क्रिटीक (पुरुषानुगामी साहित्याचे स्त्रीवादी वाचन/स्त्रीवादी दृष्टिकोन)

" पुरुषानुगामी साहित्याचे स्त्रीवादी वाचन ही स्त्रीवादी समीक्षेची एक नवी दिशा आहे. स्त्री साहित्याचे मूल्यमापन स्त्रीच्या भूमिकेत जाऊन केले पाहिजे असा हा विचार आहे. अबला, माता, दासी किंवा देवता म्हणून स्त्रीरुपे साहित्यात येतात ती पुरुषप्रधान संस्कृतीचा अविष्कार असतात. स्त्रीत्वाचा बळी घेणाऱ्या अशा प्रतिमांचे विकृत रुप नाकारुन त्याचे परखड मूल्यमापन करणे हाच स्त्रीवादी दृष्टिकोन होय." 'मराठीत टाटा समाजविज्ञान संस्थेने घेतलेल्या अभ्यास प्रकल्पातून साहित्याचे स्त्रीवादी वाचन अलिकडे झाले आहे. 'स्व' च्या शोधासाठी चाललेला स्त्रीचा झगडा समजावून घेण्यासाठी महादाइसा, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, वेणाबाई या संत स्त्रियांच्या वाङ्मयांचे स्त्रीवादी वाचन असे या अभ्यासप्रकल्पाचे स्वरुप आहे. '[२०] 'अशाप्रकारे साहित्यकृतीचा नव्याने अर्थ लावणे हा या समीक्षा पद्धतीचा गाभा आहे. '

२) गायनोक्रिटिक (स्त्री साहित्याची समीक्षा विश्लेषण/स्त्रीकेंद्री दृष्टिकोन)

'स्त्री साहित्याचा राजकारणनिरपेक्ष व वाङ्मयकृतीनिष्ठ विचार करणाऱ्या स्त्रीवादी साहित्य विचाराला शोवॉल्टरने गायनोक्रिटीक असे म्हटले आहे.' [२१] पुरुषनिर्मिती सिद्धांत किंवा प्रारुपे घेण्याऐवजी स्त्रीच्या अनुभवांवर आधारित अशी नवी प्रारुपे विकसित करणे व स्त्रीलिखित साहित्याच्या विश्लेषणासाठी स्त्रीकेंद्री चौकट रचणे हे या समीक्षेचे उद्दिष्ट आहे असे त्या म्हणतात. [२२] ऋतूप्राप्ती व त्याचा शारीर-मानसिक अवस्थेशी असणारा जैविक संबंध, स्वत:च्या शरीरात दुसऱ्या जीवाला वाढविण्याचा गर्भधारणेचा वैशिष्ट्यपूर्ण अनुभव, अपत्य संगोपनातील स्तनपानाचा शारीर-मानसिक देवघेवीचा अनुभव असे स्त्री शरीरनिष्ठ अनुभव पुरुषांना येऊ शकत नाहीत. त्यामुळे पुरुषमन आणि स्त्रीमन यात अंतर पडते. स्त्री-पुरुषातील या नैसर्गिक शरीरभेदाचा विचार स्त्रीवादी साहित्य विचारात केला जातो.

स्त्री साहित्यातील अशा स्त्रविशिष्ट अनुभवाच्या आकलनासाठी शोवॉल्टरने चार प्रकारचे नमुने सुचविले आहेत. [२३]

१) स्त्री शारीरनिष्ठ अनुभवांचे आकलन

२) स्त्रीनिष्ठ मनोविश्लेषण

३) स्त्रीकेंद्री भाषिक अभिव्यक्तीचे आकलन

४) स्त्रीनिष्ठ सांस्कृतिक अनुभव विश्वाचे अर्थनिर्णयन.

स्त्री साहित्यिकांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचा वेध घेण्यासाठी शोवॉल्टरने ही स्वतंत्र स्त्रीनिष्ठ समीक्षादृष्टी विकसित करण्याची आवश्यकता पटवून दिली आहे. 'स्त्रीवादी समीक्षा दृष्टीतून स्त्री-संहितांचे पुनर्वाचन झाल्यास किंबहूना स्त्रीवादी वाचनसंस्कृतीची वाढ झाल्यास स्त्रियांच्या साहित्याची अधिक चांगल्याप्रकारे व योग्य समीक्षा होऊ शकेल व ती स्त्री साहित्याच्या वाढीस पोषक ठरेल.'

०७ स्त्रीवादी समीक्षा :

केवळ साहित्याचे अधिष्ठान नसलेल्या व सामाजिक चळवळींच्या परिणामामुळे साहित्यक्षेत्रात प्रभावी ठरलेल्या अशा काही समीक्षापद्धती प्रामुख्याने विसाव्या शतकात मराठी साहित्यात आपले स्थान निर्माण करुन गेल्या. त्यापैकी स्त्रीवादी साहित्य समीक्षा ही १९६० नंतर मराठी साहित्यप्रांतात दाखल झालेली एक महत्वाची समीक्षापद्धती आहे. स्त्रीवादी साहित्यसमीक्षा या आंतरशाखीय अभ्यासात 'लिंग' हा मूलभूत घटक मध्यवर्ती मानला जातो. १९६० ते १९७० या काळात पाश्चात्य जगातील स्त्रियांच्या चळवळींनी स्त्री अभ्यासाला गती दिली आणि त्यातूनच स्त्रीवादी साहित्यसमीक्षेचा उदय झाला. सिमॉन द बोव्हा यांचा 'द सेकंड सेक्स', केट मिलेट यांचा 'सेक्सुअल पॉलिटिक्स', बेटी फ्रिडन यांचा 'द फेमिनिन मिस्टिक', जर्मेन ग्रीअर यांचा 'द फिमेल यूनक' इ. ग्रंथ आरंभीच्या स्त्रीवादी समीक्षेचे आधारस्तंभ होते. सत्तरच्या दशकात स्त्रीवादी समीक्षेचे स्वरुप, व्याख्या, उद्दिष्ट या संदर्भात विपूल लेखन झाले. अमेरिका, इंग्लंड आणि फ्रान्स या देशात ७० आणि ८० च्या दशकात बरीच पुस्तके प्रकाशित झाली आणि त्यातून स्त्रीवादी समीक्षा विचारातील बहुविधता आणि विविधता प्रकट झालेली दिसते.

स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना

स्त्रीवादी समीक्षेसंदर्भात अनेक गैरसमज असलेले दिसतात. स्त्रीकेंद्री कथानक असलेल्या कलाकृतींचे समीक्षण करणारी समीक्षा म्हणजे स्त्रीवादी समीक्षा तसेच काहींना केवळ पुरुषप्रधानतेविरुद्ध लढा म्हणजे स्त्रीवादी समीक्षा असेही वाटते. पण या समीक्षेच्या वेगवेगळ्या समीक्षकांनी वेगवेगळ्या व्याख्या सांगितलेल्या आहेत.

अश्विनी धोंगडे यांचे या बाबतीत असे मत आहे की, 'वाङ्मयीन कलाकृतीकडे पाहण्याचा स्त्रीकेंद्री दृष्टिकोन आणि समाजातील रुढ पितृसत्ताक पद्धतीला वाङ्मयीन समीक्षेच्या माध्यमातून दिलेला धक्का म्हणजे स्त्रीवादी समीक्षा. [२४]

पाश्चात्य समीक्षिका तोरेल मुआ यांनी या बाबतीत आपले मत व्यक्त करताना म्हटले आहे. 'स्त्रीवादी समीक्षा हे विशिष्ट असे राजकीय संभाषित आहे. पितृसत्ता आणि लिंगवाद यांच्याशी पुकारलेल्या लढ्यात सहभाग असलेला समीक्षात्मक आणि सैद्धांतिक व्यवहार आहे. ' [२५]

तर ज्युडिथ फेटरली यांच्या शब्दात सांगायचे तर, स्त्रीवादी समीक्षा ही एक राजकीय कृती आहे, जगाचा अर्थ सांगणे एवढाच या समीक्षेपुढचा उद्देश नाही तर ते बदलणे हाही आहे आणि हा बदल जे लोक वाचतात त्यांच्या जाणिवेत आणि ते जे काय वाचतात त्याच्याशी असलेल्या त्यांच्या संबंधात बदल घडवून प्रत्यक्षात आणायचा आहे. ' [२६]

या समीक्षकांनी केलेल्या व्याख्यांच्या आधारे जरी स्त्रीवादी समीक्षेचे स्वरुप आपल्या लक्षात आले असले तरी एलेन शोवॉल्टर यांनी स्त्रीसाहित्याची समीक्षा करताना वापरलेल्या Female (स्त्री), Feminine (स्त्रीजातीय) आणि Feminist स्त्रीवादी या संज्ञा पूर्णपणे समजल्याशिवाय स्त्रीवादी समीक्षेचे योग्य आकलन होऊ शकणार नाही असे काही समीक्षकांचे मत आहे.

१) Female स्त्री :-

या अवस्थेत स्त्रीचे दैहिक अनुभव, नातेसंबंधाविषयक अनुभव या सर्व अनुभवामधून स्वत:च्या रुपाचा शोध घेण्याचा स्त्रीलेखक प्रयत्न करत असतो.

२) Feminine (स्त्रीजातीय) : –

या अवस्थेत स्त्री वाङ्मयात स्त्रिया पुरुषाने निर्माण केलेल्या स्त्रीत्व प्रतिमांचाच स्वीकार करतात. त्या वाङमयातील निवेदनपद्धती, शैली, संरचना, व्यक्तीचित्रण या सर्वांवर पुरुषप्रधान रचनेचाच प्रभाव असतो.

३) Feminist (स्त्रीवादी) : –

ही अवस्था पुरुषनिर्मित स्त्रीप्रतिमा नाकारण्याची असते. केवळ पुरुषनिर्मित स्त्रीप्रतिमाच नव्हे तर पुरुषसत्ताक व्यवस्थेने घडविलेले कायदे, राज्यव्यवस्था, वैद्यक इ. सर्वच गोष्टींना स्त्रीलेखनातून नकार मिळत जातो.

स्त्रीवादी समीक्षेच्या प्रारंभिक अवस्थेतील या नमुनारुपाच्याआधारे स्त्रीसाहित्याची परंपरा व इतिहास यांच्यातील नाते उलगडता येऊ शकते. तसेच एखाद्या स्त्री साहित्यिकाच्या वाङ्मयीन प्रवासातून विकसित होत गेलेल्या तिच्या वाङ्मयीन जाणीवेचाही शोध घेता येतो. असे शोवॉल्टर यांचे मत आहे. [२७]

स्त्रीवादी समीक्षेच्यादृष्टीने साहित्यांचे आकलन व मूल्यमापन कसे करावे याचे काही निकष मंगला वरखेडे यांनी सांगितलेले आहेत.

१) पुरुषसत्ताक मूल्यदृष्टितून आलेल्या रचनाबंधाना छेद देऊन नवे मानदंड नवी मूल्ये निर्माण करणे.

२) इतिहासात दडपल्या गेलेल्या लेखिकांची पुन:स्थापना करणे.

३) पुरुषनिर्मित साहित्याचे स्त्रीवादी वाचन करणे.

४) स्त्रीवादी वाचकसमूह तयार करणे.

५) केवळ स्त्रियांच्या आकृतीबंधाचा शोध घेऊन त्यांची प्रस्थापना करणे. [२८]

०८ स्त्रीवादी समीक्षा : भौगोलिक वर्गीकरण :-

१) अमेरिकन स्त्रीवाद :-

या समीक्षेचा संहितेवर भर आहे. आशय, भाषा, अविष्काराचा रुपबंध इ. गुण वैशिष्ट्यांच्या आधारे पुरुषकेंद्री संहितेपेक्षा स्त्रीकेंद्री संहिता कशी वेगळी असते किंवा असली पाहिजे हे सांगण्यावर या पद्धतीचा भर आहे.

२) ब्रिटिश स्त्रीवाद :-

या विचारधारेवर मार्क्सवादी विचारधारेचा प्रभाव आहे. सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनावर या विचारधारेचा अधिक भर आहे. या स्त्रीवादाची उभारणी विद्यापीठाबाहेरील प्रकाशनसंस्था, वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमे राजकीय गट, पंथ यातून झालेली आहे. पुरुषसत्तेचा सामाजिक संरचनावर कसा प्रभाव पडत असतो आणि त्यामुळ स्त्रिया कशा दडपल्या जातात याची मिमांसा यात केली जाते.

३) फ्रेंच स्त्रीवाद : -

पुरुषप्रधान समाजरचनेतील भाषा व्यवहाराची पुरुषत्वच केंद्रस्थानी असते. त्यामुळे ज्ञानक्षेत्रावरही ही पुरुषसत्ताच प्रभाव गाजवीत असते. भाषेवरील हे पुरुषकेंद्री आवरण स्त्रीला प्रकट व्हायला अडसर निर्माण करते. त्यामुळे स्त्रियांनी दडपणुकीपासून मुक्त असलेली स्त्रीविशिष्ट भाषा शोधणे तिला अभिव्यक्त होता येईल असे संभाषित निर्माण करणे यावर फ्रेंच स्त्रीवादाचा भर आहे.

अशाप्रकारे स्त्रीवादी समीक्षेने लेखिकांकडे योग्य लक्ष पुरवणे, स्त्रियांच्या लेखनाचा पुनर्अभ्यास करणे, स्त्रीवादी सिद्धांताना जागा उपलब्ध करुन देणे, प्रस्थापित पुरुष लेखकांच्या साहित्यकृतीचे स्त्रीवादी दृष्टिकोणातून पुनर्वाचन करणे आणि मुख्य म्हणजे पुरुषांनी काबीज केलेल्या आणि पुरुष संस्कृतीने ठरविलेल्या सामाजिक संकेतांच्या चौकटीतून साहित्याकडे पाहणाऱ्या समीक्षा क्षेत्राला

पुनर्मूल्यमापन करण्याची गरज दाखवून देणे इ. विविध स्तरावर आपले कार्य चालू केले आहे.

०९ सारांश :–

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून जगभर विविध अशा ज्या संकल्पना साहित्याच्या आणि समीक्षेच्या प्रांतात उदयाला आल्या त्यापैकी स्त्रीवाद ही एक महत्वाची संकल्पना आहे. कित्येक वर्षापासून पुरुषप्रधान संस्कृतीच्या वर्चस्वाखाली दडपल्या गेलेल्या व सर्व अधिकारांपासून वंचित राहिलेल्या स्त्रियांना त्यांचे अधिकार मिळवून देण्यासाठी तसेच प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरचा समान वाटा मिळवून देण्यासाठी १९६० नंतरच्या दशकात वेगाने पुढे आलेली ही विचारप्रणाली आहे. १९६० पूर्वी पाश्चात्य देशात सिमॉन दि बोव्हा यांच्या 'द सेकंड सेक्स' या ग्रंथापासून स्त्रीवाद लेखनातून वाचकांसमोर येऊ लागला. त्यानंतर फ्रेंच स्त्रीवाद, अमेरिकन स्त्रीवाद, ब्रिटिश स्त्रीवाद, मवाळ स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, कृष्णवर्णीय स्त्रीवाद, पर्यावरणीय स्त्रीवाद अशा विविध विचारप्रवाहांचा उदय झाला. भारतातही गेल्या तीन दशकात स्त्रीवाद आपले पाय रोवू लागला आहे. ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री–पुरुष तुलना' या ग्रंथाने पुरुषप्रधान संस्कृतीवर घणाघाती हल्ला करत प्रथम भारतात स्त्रीवादाची वैचारिक मांडणी केली आणि त्यांच्या विचारातूनच प्रेरणा घेऊन स्त्रीवाद वेगाने वाटचाल करत आहे. यातूनच पुढे स्त्रीवादी साहित्य, स्त्रीवादी समीक्षा, स्त्रीवादी साहित्यशास्त्र या संकल्पना आकाराला येऊ लागल्या. एकंदरित विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून आजपर्यंत स्त्रीवादाने जगभर आपले जाळे पसरलेले दिसून येते.

संदर्भ सूची

१) सुक्मणि रॉय — 'रा. चि. ढेरे लिखित 'लज्जागौरी' : एक पुनर्विचार', 'श्रीवाणी' स्त्रीवादी साहित्य विशेषांक ऑक्टो. १९९३ संपा. सदानंद मोरे, पृ. क्र. ९८

२) अश्विनी धोंगडे — 'स्त्रीवादी समीक्षा स्वरुप आणि उपयोजन', दिलीपराज प्रकाशन, पुणे पृष्ठ क्र. ६

३) गुंफा कोकाटे — 'स्त्रीवादी समीक्षादृष्टीतून सानियाचे साहित्य', 'नवभारत' फेब्रुवारी २००५ पृष्ठ क्र. ३४

४) गुंफा कोकाटे — तत्रैव, पृष्ठ क्र. ३४

५) डॉ. मंगला वरखेडे — स्त्रीवाद, समीक्षेतील नव्या संकल्पना संपा. मनोहर जाधव, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद पृ. क्र. १२६

६) डॉ. मंगला वरखेडे — तत्रैव, पृ. क्र. १२७

७) डॉ. मंगला वरखेडे — तत्रैव, पृष्ठ क्र. १२७

८) डॉ. मंगला वरखेडे — तत्रैव, पृष्ठ क्र. १२४

९) अरुणा श्री. दुभाषी — भारतीय स्त्रीवाद, समीक्षेतील नव्या संकल्पना, संपा. मनोहर जाधव, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद. पृष्ठ क्र. १४१

१०) अरुणा श्री. दुभाषी — तत्रैव, पृ. क्र. १४३

११) संपा. विलास खोले — ताराबाई शिंदे लिखित स्त्रीपुरुष तुलना यथामूल संशोधित आवृत्ती), प्रतिमा प्रकाशन, पुणे. पृ. क्र. २४

१२) मृणालिनी जोगळेकर — 'स्त्री अस्मितेचा अविष्कार' : एकोणिसावे शतक भाग १ पंडिता रमाबाई पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. पृ. क्र. ६५

१३) गुंफा कोकाटे — 'स्त्रीवादी समीक्षादृष्टीतून सानियाचे साहित्य', 'नवभारत' फेब्रु. २००५. पृ. क्र. ३४

१४) डॉ. अश्विनी धोंगडे 'स्त्रीवादी साहित्य व समीक्षा' महाराष्ट्र साहित्यपत्रिका जुलै-सप्टें. १९९१ पृ. क्र. ५२

१५) डॉ. मंगला वरखेडे 'स्त्रियांचे कथालेखन नवी दृष्टी, नवी शैली', साकेत प्रकाशन, औरंगाबाद. दुसरी आवृत्ती. पृ. क्र. ५

१६) डॉ. मंगला वरखेडे 'स्त्रीवाद', 'समीक्षेतील नव्या संकल्पना', संपा. मनोहर जाधव, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद. पृ. क्र. १२९

१७) डॉ. मंगला वरखेडे तत्रैव, पृ. क्र. १३०

१८) डॉ. मंगला वरखेडे तत्रैव, पृ. क्र. १३१

१९) प्रतिभा कणेकर 'एलेन शोवॉल्टर-स्त्रीवादी समीक्षा ते स्त्रीकेंद्री समीक्षा', अनुष्टुभ, जाने-फेब्रु. २००३ पृ. क्र. १२

२०) डॉ. मंगला वरखेडे स्त्रियांचे कथालेखन नवी दृष्टी, नवी शैली, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. दुसरी आवृत्ती पृ. क्र. ६

२१) डॉ. मंगला वरखेडे 'स्त्रीवाद', 'समीक्षेतील नव्या संकल्पना' संपा. मनोहर जाधव स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद. पृ. क्र. १३६.

२२) प्रतिभा कणेकर 'एलेन शोवॉल्टर-स्त्रीवादी समीक्षा' ते स्त्रीकेंद्री समीक्षा, अनुष्टुभ जाने.-फेब्रु. २००३. पृ. क्र. १३

२३) डॉ. मंगला वरखेडे 'स्त्रियांचे कथालेखन नवी दृष्टी, नवी शैली', साकेत प्रकाशन, औरंगाबाद. पृ. क्र. ९

२४) डॉ. आश्विनी धोंगडे स्त्रीवादी साहित्य स्वरुप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन, पुणे पृ. क्र. ४३

२५) वसंत आबाजी डहाके 'स्त्रीवादी साहित्यसमीक्षा : स्वरुप आणि व्याप्ती', 'श्रीवाणी' स्त्रीवादी साहित्य विशेषांक ऑक्टो. १९९३ पृ. क्र. ९८

२६) वसंत आबाजी डहाके तत्रैव, पृ. क्र. ४४

२७) प्रतिभा कणेकर 'एलेन शोवॉल्टर–स्त्रीवादी समीक्षा ते स्त्रीकेंद्री समीक्षा', अनुष्टुभ जाने–फेब्रु २००३ पृ. क्र. १२

२८) डॉ. मंगला वरखेडे स्त्रीवाद
समीक्षेतील नव्या संकल्पना
संपा. डॉ. मनोहर जाधव,
स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.
पृ. क्र. १२८

❑❑❑